MHKO110030302024

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२८३/२०२४.</u>**
(CNR No.**MHKO110030302024**)

**<u>निशाणी क्रमांक १२ खालील आदेश.</u>**
(भारती गुमताज वि. गुणपाल गुमताज )

सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(अ) व (ड) प्रमाणे वादीचा दावा काढून टाकण्यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी यांच्या कथनांनुसार, प्रस्तुत दावा हा वादीने हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादीच्या कथनांनुसार वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दिनांक ११/०१/१९९४ रोजी झालेल्या खरदीपत्रानुसार वादी यांच्या नावाची नोंद करून देण्याबाबत प्रतिवादी यांना आदेश होण्याची विनंती केली आहे. मात्र वादी हे सन १९९४ साली झालेल्या खरेदीखताबाबतची दाद जवळपास तीस वर्षांनंतर मागत आहेत. त्यामुळे वादी यांचा दावा हा मुदतीत नाही. तसेच, वादी यांनी त्यांच्या दाव्यामध्ये त्यांना सदरचा दावा दाखल करण्यात इतका विलंब का झाला आहे, याबाबत देखील कोणतेही कारण नमूद केलेले नाही. सबब, या सर्व कारणांसाठी प्रतिवादी यांनी वादीचा प्रस्तुतचा दावा काढून टाकण्याची विनंती केली आहे.

०३. वादीने प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे **निशाणी क्र.१३** वर सादर करून अर्जातील संपूर्ण कथने खोटी व लबाडीची असल्याचे म्हंटले आहे. वादी यांच्या कथनांनुसार, प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जामध्येच दावा मिळकतीचे नोंद खरेदीपत्र वादीच्या नावे करून दिले असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे, खरेदीपत्रातील अटीप्रमाणे मिळकतीच्या ७/१२ पत्रकी वादीच्या नावाची नोंद करून देण्याची कायदेशीर जबाबदारी देखील प्रतिवादीचीच आहे. तसेच, दिनांक १८/१०/२०२४ व त्यानंतर २०/११/२०२४ रोजी दाव्यास कारण घडले असल्यामुळे दावा मुदतीत आहे. सबब, प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

०४. अर्ज व त्यावर दाखल म्हणण्याचे व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्यावरून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निश्चित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष. |
|---|---|---|
| १. | वादी यांनी दाव्यास कारण घडल्याचे नमूद केले नाही काय ? | **नकारार्थी.** |
| २. | दाव्यातील कथनांवरून दाव्यास कोणत्याही कायद्याची बाधा राहाते काय ? | **नकारार्थी.** |
| ३. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**मुद्दा क्र.१ व २ बाबत -**

०५. सदर दोन्ही मुद्द्याकरिता एकत्रित युक्तिवाद आल्यामुळे, सदरचे दोन्ही मुद्दे एकत्रित चर्चेसाठी घेण्यात आले आहेत.

०६. प्रस्तुत अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ०७ नियम ११ नुसार सादर करण्यात आलेला आहे. अशा अर्जाचा विचार करताना, दाव्यातील कथने विचारात घेणे आवश्यक आहेत. प्रतिवादी यांचा बचाव व कैफियत यांचा विचार करणे गरजेचे नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी यांनी हक्कज्ञापन व मनाई हुकूम मागितल्याचे दिसून येते. प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे दाव्यात दिनांक १०/०१/१९९४ रोजी रजि. दस्त क्र. ११२/१९९४ रोजी खरेदीखत झाल्याचे कथन दाव्यात दिसून येते. परंतु, सदरचे खरेदीखत आव्हानीत करण्यासाठी वादीची केस नाही. उलटपक्षी त्या दिवसापासून कब्जा असल्याचे वादीचे कथन आहे. त्याचप्रमाणे दाव्यास कारण म्हणून परिच्छेद क्र.०५ मध्ये दिनांक १८/१०/२०२४ रोजी केलेली विनंती व दिनांक २०/११/२०२४ रोजी प्रतिवादी यांनी वादीला केलेला तथाकथित मज्जाव, अशी कारणे नमूद केल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने मनाई हुकूम मागितल्याचे देखील दिसून येते.

०७. त्यामुळे, केवळ दाव्यामध्ये दिनांक १०/०१/१९९४ ही खरेदीची तारीख नमूद आहे, म्हणून दाव्यास मुदतीची बाधा येते हे मान्य होण्यासारखे नाही. दाव्यातील विनंती कलम हा या ठिकाणी महत्त्वाचा ठरतो. मनाई हुकुमासारखी विनंती व त्यासाठी घडलेले कारण हे सकृतदर्शनी मुदतीच्या कायद्याची बाधा आणणारी ठरत नाहीत. त्याचप्रमाणे, दाव्यातील कारण स्पष्टपणे नमूद केले असल्यामुळे दाव्यास कारण नाही, हे प्रतिवादी यांचे म्हणणे या ठिकाणी मान्य

होण्यासारखे नाही. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर होण्यास पात्र राहातो. करिता मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी देऊन मुद्दा क्र.३ साठी खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश.</u>

१. प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

२. येणे प्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2025.10.18 11:01:3[illegible] +0530

(श्रीनिवास अ. कुलकर्णी)

दिनांक. १७/१०/२०२५. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पेठ वडगांव